## भाग १

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी वर्ग –१ यांचे न्यायालय, मालवण, जि. सिंधुदुर्ग**<br>(पीठासीन अधिकारी श्री.एम.के.फकीह)<br>(अधिघोषित दिनांक २५/०३/२०२६ )<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १५७/२०२४**<br>**सी.एन.आर.क्र.एमएचएसआय ०७०००३५९२०२४ निशाणी क्र.६ लगत** |
| | प्रथम खबर अहवाल गुन्हा क्रमांक – १२३/२०२४<br>पोलीस स्टेशन – मालवण पोलीस स्टेशन |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे ठाणे प्रमुख<br>मालवण पोलीस स्टेशन, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग |
| सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्री. एन.एस.कुंटे |
| आरोपी | सत्यवान गोपाळ पाटकर,<br>वय – ५५ वर्षे,<br>रा. वायरी भुतनाथ तेलीवाडी<br>ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग |
| आरोपीतर्फे वकील | श्री.आर.ए.मोंडकर |

## भाग २

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २९/०७/२०२४ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २९/०७/२०२४ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १७/०८/२०२४ |
| गुन्ह्याचा संक्षेप नोंदवल्याची तारीख | २५/०२/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२/०३/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवण्याची तारीख | निरंक |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय तारीख | २५/०३/२०२६ |
| शिक्षा सुनवल्याची तारीख, असल्यास | निरंक |

## आरोपीची माहीती

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | आरोपी च्या अटकेची तारीख | आरोपीची जामीनावर मुक्तता झाल्याची तारीख | आरोपी विरुध्द निश्चीत करण्यात आलेले गुन्हे | आरोपी ची निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरवण्यात आले | आरोपीस सुनवण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहिते नुसार संप परिक्षेच्या कालावधी मध्ये आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सत्यवान गोपाळ पाटकर | निरंक | निरंक | महाराष्ट्र दारुबंदी अधि नियम कलम ६५(ई) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

# भाग ३

## अ) अभियोग पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निखील नरेश साळवी | घटनास्थळ जप्ती पंच |
| २. | धोंडू विठ्ठल जानकर | फिर्यादी |

## ब) बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास**

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी</u>**

**अ) अभियोग पक्ष**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | पी२/पी.डब्ल्यू२ | फिर्याद |

**ब) बचाव पक्ष**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन निशाणी**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड) मुद्देमाल तपशील**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## <u>न्या य नि र्ण य</u>

१. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ ई अन्वये दोषारोपपत्र दाखल केले आहे.

२. प्रस्तुत कामी फिर्यादी धोंडू विठ्ठल जानकर याने दाखल केलेल्या फिर्यादनुसार आरोपीविरुध्द गुन्हा रजि. क्र. १२३/२०२४ दाखल करण्यात आला. त्याच्या तपास पुर्ण झालेनंतर आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल झाले. आरोपी अभियोगाचे कामी हजर झालेनंतर त्यास दोषारोपाचा सारांश समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा नाकबूल केला व स्वतःचा बचाव करणार असे सांगितले.

३. अभियोग पक्षाने खटला शाबीत करणेकरीता दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. तसेच अभियोग पक्षाने नि.क्र.पी२/पीडब्ल्यू२ फिर्याद, या कागदोपत्री पुराव्याची जोड दिली आहे.

०४. अभिलेखावरील पुराव्याआधारे आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ (१) (ब) अन्वये जबाब नोंदविला. आरोपीने त्याचे बचावात त्याने गुन्हा केलेला नाही असा बचाव घेतला आहे.

०५. सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एन.एस.कुंटे व बचाव पक्षाचे विधीज्ञ श्रीमती आर.ए.मोंडकर यांचा युक्तीवाद ऐकला.

०६. अभिलेखावरील फिर्याद, दोषनिश्चिती व पुरावा याआधारे खटल्याचे निर्णयाकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्द्यावर पुढे दिलेल्या सविस्तर कारणांसाठी निष्कर्ष देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दि. २९/०७/२०२४ रोजी सायंकाळी ६.३० वा. वायरी भुतनाथ तेलीवाडी येथील तेली | |

| | | |
|---|---|---|
| | // १३ // <br>पाणंद येथून समुद्र किनारी आरोपीने त्याचे ताब्यात गोवा बनावटीच्या हनी ब्लेंड प्युअर ब्रॅन्डीच्या १८० मिली मापाच्या २८ दारुच्या बाटल्या विना परवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्या होत्या ? | ..... नाही. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे . |

## <u>का र ण मी मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u>** :–

०७. सा.क्र. १ निखील नरेश साळवी यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.२९/०७/२०२४ रोजी ते मालवण पोलीस स्टेशन येथे येत असताना पोलीसांनी त्यांना बोलविले होते. त्यांच्या समक्ष कुठलाही जप्ती पंचनामा झाला नव्हता असे सांगितले आहे. सा.क्र.१ निखील यांनी घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील सही मान्य करुन त्यातील मजकूर नाकारलेला आहे. सा.क्र.१ निखील हे त्यांच्या पूर्व जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ताच्यावतीने कलम १५७ भारतीय साक्ष अधिनियमच्या अनुषंगाने सुचक प्रश्न विचारले असताही सा.क्र.१ निखील यांच्या पुराव्यात अभियोग पक्षास मदत करणारा कुठलाही पुरावा उपलब्ध झाला नाही.

०८. अभियोग पक्षाचा सा.क्र.२ धोंडू जानकर हे फिर्यादी असून त्यांनी साक्षीपुराव्यात असे सांगितले आहे की, दि. २९/०७/२०२४ रोजी ते पोलीस स्टेशन येथे हजर असताना गुप्त बातमीदारातर्फे माहिती मिळाली की, वायरी भुतनाथ तेली पाणंद येथील समुद्रकिनारी एक इसम गोवा बनावटीची दारु विक्री करत आहे. त्या बातमीवरुन ते, पोहेकॉ शिवगण असे खाजगी मोटरसायकलने

बातमीच्या ठिकाणी पोहोचले, त्या ठिकाणी त्यांनी दोन पंच मंदार बोडवे व निखील साळवे यांना बोलावून घेतले. ते सर्वजण १६.३० वा. तेली पाणंद येथे पोहोचले असता त्या ठिकाणी आरोपी दोन बंदाची कापडी पिशवी घेवून संशयास्पद दिसून आला, त्याच्याकडील पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये हनी ब्लेंड प्युअर ब्रॅन्डी च्या १८० मिली मापाच्या २८ बाटल्या मिळून आल्या, आरोपीने त्याचे नाव सत्यवान गोपाळ पाटकर रा. वायरी भूतनाथ तेलीवाडी असे सांगितले, सदरच्या मुद्देमालातून दोन बाटल्या नमूना पृथःकरणासाठी काढून सिलबंद करुन पोहेकॉ शिवगण यांनी जागीच पंचनामा करुन जप्त केला. सदर घटनेबाबत त्यांनी नि.क्र.पी२/पीडब्ल्यू२ प्रमाणे फिर्याद दिली असल्याचे सांगितले आहे.

०९. सदर साक्षीदाराने आपल्या उलट तपासामध्ये वायरी हा गजबजलेला गाव असून घटनास्थळाच्या शेजारी बरीच लोकवस्ती आहे. तसेच देवबाग हा पर्यटनस्थळ असल्याने तेथे लोकांची व पर्यटकांची ये जा सुरु असते. तसेच घटनास्थळाचा सर्व्हे नं., घर नंबर ते सांगू शकत नसल्याचे मान्य केले आहे.

१०. फिर्यादी यांनी आपल्या पुराव्यात आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त करण्यात आला असे सांगितले आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार छाप्याच्या ठिकाणची जागा ही वायरी भुतनाथ तेली पाणंद येथील असून ती जागा दाट लोकवस्तीत आहे. छाप्याची कारवाई ही भर दिवसा झालेली असून आजुबाजूला हजर असणाऱ्या कोणाही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष छाप्याच्या कारवाईस समर्थन अथवा पुष्टी देण्याकरीता नोंदविण्यात आलेली नाही. तपासिक अंमलदार यांनी छप्यावेळी स्थानिक पंच उपलब्ध होत असताना देखील नेहमीच्या पंचाना घेवून कारवाई केल्याचे दिसून येते.

११. अभिलेखावर नमूना प्रयोगशाळेत पाठविलेबाबतचे पत्र दाखल असले आहे. सदर पत्रावरुन नमूना हा प्रयोगशाळा तपासणीकरीता घेवून जाणाऱ्या

वाहकाची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे कार्यालयात मुद्देमाल कारकून असूनही त्याच्याकडून नमूना बाटली घेवून जाणाऱ्या वाहकाकडे नमूना बाटली प्राप्त झाली असे दिसून येत नाही. त्यामुळे या गुन्हयातील जप्त मुद्देमालातूनच घेतलेल्या नमूना द्रव्याची बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविली याबाबत शंका निर्माण होते.

१२. कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यानुसार गुन्हा सिध्द होण्यासाठी जप्त मुद्देमाल दारु आहे, तसेच सदरचा मुद्देमाल आरोपी विना परवाना विक्री करण्यासाठी बाळगून होता या बाबी सिध्द करणे आवश्यक आहेत. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सा.क्र.२ धोंडू जानकर यांच्या उपरोक्त आलेल्या पुराव्यावरुन उपरोक्त नमुद मुद्देमाल आरोपीकडून मिळून आला होता ही बाब जरी मान्य केली तरी अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्त मुद्देमाल दारु आहे ही बाब सिध्द करण्याकरीता प्रयोगशाळा पृथ्थकरणाचा अहवाल सादर केलेला नाही. प्रयोगशाळा पृथ्थकरण अहवालाच्या अभावी जप्त केलेली वस्तू दारु आहे ही बाब सिध्द होवू शकलेली नाही. सबब, आरोपीविरुध्द निश्चित करण्यात आलेले दोष संशयाच्या पलीकडे जावून सिध्द होत नाही. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत:</u>**–

१३. वरील सर्व विवेंचनावरुन असे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष आरोपीवरील अपराध सर्व संशयाच्यापलिकडे जावून शाबीत करु शकेलेला नाही. अभियोग पक्षाचा पुरावा पुरेसा व संयुक्तीक वाटत नाही. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळणेस पात्र आहे. जप्त मुद्देमाल आरोपीने परत मागितला नाही अगर त्यावर आपला हक्क सांगितलेला नाही. त्यामुळे सदरचा मुद्देमाल कायदेशीर क्रियेने नाश करणे योग्य आहे. सबब, मुद्दा क्र.१ चे निष्कर्षाचे अनुषंगाने मी मुद्दा क्र. २ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | आरोपी सत्यवान गोपाळ पाटकर याची कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा या गुन्ह्यातून कलम २७८(१) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचे व जामीनदाराचे जामीन व जात मुचलके रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | जप्त मुद्देमाल अपील कालावधी नंतर पुढील कार्यवाहीसाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाकडे पाठविण्यात यावा व त्यांनी तो महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ९८ प्रमाणे नाश करण्यात यावा. |
| ४. | आरोपीने कलम ४८१ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ नुसार माननीय अपिलार्थी न्यायालयाने नोटीस निर्गमित करुन हजर राहण्यास आदेशित केल्यास अपिलार्थी न्यायालयासमक्ष हजर राहण्याबाबत १५,०००/– रुपयांचे वैयक्तीक बंधपत्र द्यावे. |
| | (खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय अधिघोषित.) |

ठिकाण : मालवण
दिनांक : २५/०३/२०२६

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मालवण.